# दैनिक महावृत्त

E-Mail:dainikmhavratt@gmail.com

संपादक-अशोक हनवते.मो-9421094991,7264079990

लातूर वर्ष ४ थे अंक ११२ वा शनिवार दि.०५ ऑक्टोंबर २०२४ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.


## समाजातील सर्वसामान्य व्यक्तीला या भवनाचा उपयोग व्हावा : क्रीडा व युवक कल्याण बंदरे मंत्री संजय बनसोडे

### उदगीर शहरात उभारण्यात आलेल्या श्री गुरु हावगीस्वामी विरशैव लिंगायत भवनचे ना.संजय बनसोडे यांच्या हस्ते लोकार्पण







उदगीर / प्रतिनिधी :- मतदार संघाचा सर्वांगीण विकास करुन सर्वजाती धर्माला न्याय दिला असुन मतदार संघात विविध समाजाची सभागृहे व प्रार्थना स्थळांना निधी दिला त्याचबरोबर प्रत्येक समाजाची मागणी लक्षात घेवुन भव्य - दिव्य भवनाची निर्मिती केली. या सर्व भवनाचा उपयोग समाजातील सर्वसामान्य व्यक्तीला व्हावा अशी भावना राज्याचे क्रीडा व युवक कल्याण बंदरे मंत्री संजय बनसोडे यांनी केले. ते उदगीर शहरात उभारण्यात आलेल्या श्री गुरु हावगीस्वामी विरशैव लिंगायत भवनाच्या लोकार्पण सोहळ्याप्रसंगी बोलत होते. यावेळी श्री.श्री.श्री. १००८ जगद्गुरु ज्ञानसिंहासनाधिश्वर डॉ. चंद्रशेखर शिवाचार्य महास्वामीजी, गुरूवर्य गहिनीनाथ महाराज औसेकर, गुरुवर्य डॉ.शंभुलिंग शिवाचार्य महाराज, गुरूवर्य शांतीवीर शिवाचार्य महाराज, गुरूवर्य आचार्य गुरुराज महाराज अहमदपुरकर, गुरूवर्य बसवलिंग शिवाचार्य महाराज, गुरूवर्य सिध्दलिंग शिवाचार्य महाराज, गुरूवर्य चन्नमल्ल महास्वामीजी, शंकरलिंग शिवाचार्य महाराज, हावगीलिंग शिवाचार्य महाराज,विरुपात शिवाचार्य महाराज, सुखदेव स्वामी महाराज, किरण महाराज उदगीर, उमाकांत महाराज, माजी आ.धर्माजी सोनकवडे, माजी नगराध्यक्ष राजेश्वर निटुरे, एल.डी. देवकर, मुख्याधिकारी सुंदर बोंदर, चंद्रकांत वैजापुरे, सिद्धेश्वर पाटील, रमेश अंबरखाने, रामराव बिरादार, लक्ष्मीबाई पांढरे, उध्दव महाराज हैबतपुरे, अनिता हैबतपुरे, सुधीर भोसले, विजय निटुरे, शिवराज नावंदे गुरुजी, बालाजी भोसले, सय्यद जानीमियाँ, वसंत पाटील, शशिकांत बनसोडे, उत्तरा कलबुर्गे, सुभाष धनुरे, गिरीष उप्परबावडे, ओम पाटील, आशा रेड्डी, नवनाथ गायकवाड, गणेश गायकवाड,बाळासाहेब पाटोदे, कुणाल बागबंदे, विमल गर्जे, आदी उपस्थित होते. पुढे बोलताना ना.संजय बनसोडे यांनी, डॉ. शंभुलिंग शिवाचार्य महाराजांनी मनाचा मोठेपणा दाखवुन लिंगायत भवनसाठी जागा उपलब्ध करुन दिल्यामुळे ही वास्तु उभारली आहे तर जंगम समाजाच्या मागणीचा विचार करुन धर्माचा प्रचार आणि प्रसार करण्यासाठी जंगम समाजासाठी श्री रेणुकाचार्य संस्कार भवनाचे काम प्रगतीपथावर असुन त्यासाठी २ कोटींचा निधी उपलब्ध करुन दिला आहे. चौकीमठासह श्री गुरु हावगीस्वामी मठाला कोट्यावधीचा निधी उपलब्ध करुन दिला आहे. द्या श्री गुरु हावगीस्वामी मठाचा जीर्णेध्दार झाला आणि मठावर सोन्याचा कळस बसवण्यात आला ही बाब आपल्यासाठी सुवर्ण क्षण आहे. आपल्या मतांची किंमत ठेवुन २४ तास जनतेच्या सेवेसाठी काम केले. उदगीर व जळकोटसह ग्रामीण व शहराचा सर्वांगीण विकास केला. मागील काळात मुलभुत व प्राथमिक गरजा पुरविल्या असुन आता मेडिकल कॉलेज, एम.आय.डी.सी., विमानतळ उभारणार असुन उदयगिरी बाबांच्या नावाने वंदे भारत रेल्वे सुरु करण्याचा माझा संकल्प आहे.

कार्यक्रमाचे सुत्रसंचलन प्रा.सिद्धेश्वर पटणे यांनी केले. यावेळी शहर व तालुक्यातील पदाधिकारी व नागरीक आणि महिला, भजनीमंडळ मोठ्या संख्येने उपस्थित होते.






## बाभळगावात रामलिला कथेस प्रारंभ वैशालीताई देशमुख यांच्या हस्ते उद्घाटन रामलिलेतून घडवले भारतीय संस्कृतीचे दर्शन

माजी मंत्री आमदार अमित देशमुख यांचा शुभ संदेश बाभळगावात रामलिला कथेस सुरुवात झाली.दरम्यान माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांनी रामलिला कथेस शुभ संदेश पाठवला.तो संदेश माणिक सगर यांनी वाचला.भारतीय महाकाव्यांतील रामायण हे प्रसिद्ध ऋषी वाल्मिकी यांनी लिहिलेले आहे. कथेच्या आयोजनातून रामलिला कथेचे विविध भारतीय मुल्य नव्यापिढीला मार्गदर्शक ठरणारे आहे, असे शुभसंदेशात नमुद केले होते.



लातूर / प्रतिनिधी :- नवरात्र महोत्सव समिती, ग्रामपंचायत, सेवा सोसायटी, तंटामुक्त ग्राम समिती व ग्रामस्थ बाभळगाव यांच्या वतीने ३ ते १२ ऑक्टोबरदरम्यान बाभळगाव येथील श्री व्यंकटराव देशमुख महाविद्यालयाच्या मैदानावर आंतरराष्ट्रीय ख्यातीचे स्वामी श्री भुवनेश्वर वशीष्ठजी महाराज यांच्या रामलिला कथेचे आयोजन करण्यात आले आहे.गुरुवारी सायंकाळी विलास सहकारी साखर कारखान्याच्या चेअरमन श्रीमती वैशालीताई विलासराव देशमुख यांच्या हस्ते रामलिला कथेचे उद्घाटन झाले.पहिल्याच दिवशी रामलिलेतून भारतीय संस्कृतीचे दर्शन घडले. श्री भुवनेश्वर वशीष्ठजी महाराज यांनी आपल्या ३० कलावंतांसह रामलीला सादर केली.गुरुवारच्या पहिल्या दिवशी गणेश वंदन, राम-सीता पुजन, हनुमान पुजन आणि आरती झाल्यानंतर रामलिला कथेत पहिला प्रसंग नारद मुनी प्रवेशाचा होता.नारद मुनी हिमालयात तपस्या सुरु केली.त्यांच्या तपस्येने इंद्रदेवाचे सिंहासन हल्ले.त्यामुळे देवनगरीत इंद्रदेव चकीत झाले.अष्टधातूंनी बनविलेले बलाढ्य सिंहासन हलविण्याची शक्ती होणाकडे आहे.या विचाराने इंद्रदेव संतापले.सिंहासन हलविण्याची शक्ती कोणामध्ये आहे.याचा शोध सुरु झाला.त्यासाठी इंद्रदेवाने कालदेवाला कामाला लावले. कालदेवाने पृथ्वीतलावर येऊन त्याचा शोध घेण्यास सुरुवात केली.तेव्हा हिमालयाच्या गुफांमध्ये नारद मुनी तपस्या करीत असल्याचे कालदेवाला दिसून आले. कालदेवाने ही सर्व हकीकत इंद्रदेवाची भेट घेऊन सांगीतली. तेव्हा इंद्रदेव क्रोधीत झाले. नारद मुनींची तपस्या भंग नाही झाली तर सिंहासन भंगुन जाईल, या विचाराने इंद्रदेवाचा पारा चढला. त्यांनी नारद मुनींची तपस्या भंग करण्यासाठी त्यांचे मित्रवर्य कामदेव यांचा पाचारण केले. कामदेवाने कालदेवास सोबत घेऊन पृथ्वी तलावर प्रवेश केला आणि नारद मुनींची तपस्या भंग करण्यासाठी कामदेवाने रंभा, उर्वशी, मेनका यांचा पाचारण केले. परंतू, नारदमुनींची तपस्या एवढी भयंकर होती की, या अप्सरांना हार मानावी लागली.तपस्या भंग झाली नाही.शेवटी कामदेवानेच नारद मुनींची तपस्या भंग केली.महाकाव्य रामायणातील एक -एक प्रसंग पुढे सरकत गेला. ते पाहताना आणि ऐकताना उपस्थित ग्रामस्थ भारतीय संस्कृतीच्या दर्शनाचे धन्य झाले. यावेळी जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष संतोष देशमुख, ट्वेन्टी वन शुगरचे व्हाईस चेअरमन विजय देशमुख, सरपंच प्रिया सचिन मस्के, उपसरंपचं गोविंद देशमुख, विविध कार्यकारी सेवा सोसायटीचे चेअरमन महादेव गंगाराम जटाळ, व्हाईस चेअरमन शिवाजी आप्पाराव जाधव, तंटामुक्त समितीचे अध्यक्ष शिवराज नागोराव देशमुख, श्याम देशमुख यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## भाजपा नेते आ. रमेशआप्पा कराड यांच्याकडून १०१ महिला भजनी मंडळांना साहित्यांचे वाटप

लातूर :- आध्यात्मीक, सामाजिक, शैक्षणिक कार्यासह, राजकारणात अग्रेसर राहून गोरगरीब सर्वसामान्य जनतेला न्याय मिळवून देणारे भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांनी अध्यात्मिक क्षेत्रातील महिलांची वाढती संख्या लक्षात घेऊन लातूर ग्रामीण मतदार संघातील तब्बल १०१ महिला भजनी मंडळांना भजनाच्या साहित्याचे वाटप केले.

देशभरातील गावागावात अध्यात्मिक क्षेत्र केवळ महिला मुळेच टिकून बहुतांशी अध्यात्मिक कार्यक्रमात महिलांचीच संख्या अधिक प्रमाणात असल्याने भारतीय जनता पार्टीचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांच्या जन्मदिनाच्या निमित्ताने मित्र परिवाराच्या वतीने दीडशेहून अधिक महिला भजनी मंडळांना साहित्याचे वाटप केले होते. दरम्यानच्या काळात ग्रामीण भागातील दौऱ्यात गावोगावच्या महिला भजनी मंडळाकडून आ. रमेशआप्पा कराड यांच्याकडे भजनाच्या साहित्याची मागणी होऊ लागली. एकूणच अध्यात्मिक क्षेत्रातील महिलांचा वाढता सहभाग लक्षात घेऊन आणि आध्यात्मिक क्षेत्र टिकून राहावे यासाठी आ. कराड यांनी महिला भजनी मंडळांना साहित्य देण्याचे मान्य केले.

बोले तसे चाले याप्रमाणे मागणी केलेल्या महिला भजनी मंडळांना आज दि ४ ऑक्टोबर २०२४ शुक्रवार रोजी लातूर येथील भाजपाच्या संवाद कार्यालयात भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांच्या हस्ते लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघातील विविध गावातील १०१ महिला भजनी मंडळांना भजनी मंडळांना टाळ, मृदंग, विणा व इतर भजनाचे साहित्याचे वाटप करण्यात आले. यावेळी भाजपा ओबीसी मोर्चाचे प्रदेश उपाध्यक्ष भागवत सोट, पंचायत राज सेलचे जिल्हा संयोजक नवनाथ भोसले, अध्यात्मिक सेलचे ज्ञानोबा भिसे, सांगायो समितीचे अध्यक्ष वैभव सापसोड, तालुकाध्यक्ष बन्सी भिसे, जिल्हा उपाध्यक्ष सतीश आंबेकर, पद्माकर चिंचोलकर, सुरज शिंदे, उमेश बेद्रे, गोविंद नरहारे, लता भोसले, अनुसया फड, भैरवनाथ पिसाळ, प्रताप पाटील, शरद दरेकर, पांडुरंग बालवाड, हनुमंत गव्हाणे, महादेव मुळे यांच्यासह अनेकांची प्रमुख उपस्थिती होती.

लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघातील सदगुरु भजनी मंडळ मुरुड, माऊली भजनी मंडळ वंजारवाडी, मन्मथ भजनी मंडळ सतधरवाडी, जय जगन्नाथा महिला भजनी मंडळ बिंदगीहाळ, संत तुकाराम महिला मंडळ सेलू (खु), संत मीराबाई महिला मंडळ बोकनगाव, काशीविश्वेश्वर भजनी मंडळ भडी, विठ्ठल रुक्मिणी भजनी मंडळ रेणापूर, विठ्ठल महिला भजनी मंडळ शेरा, पवनसुत हनुमान भजनी मंडळ घनसरगाव, महिला मंडळ पिंपरीआंबा, क्रांती महिला मंडळ ढाकणी, पद्मावती महिला भजनी मंडळ तळणी (मो), शिवगुरु महाराज मंडळ जायफळ, विठ्ठल-रुक्मिणी भजनी मंडळ हिंसोरी, श्री बाळनाथ स्वामी महिला मंडळ



चिकुर्डा, गणेश भजनी मंडळ चाटा, जय हनुमान भजनी मंडळ बरहानपूर, जय हनुमान मंडळ सलगरा (बु), चिन्मयानंद स्वामी महिला मंडळ नागझरी, जय हनुमान भजनी मंडळ सुमठाणा, विठ्ठल रुक्मिणी मंडळ बोरगाव (नकुलेश्वर), महिला भजनी मंडळ रमजानपूर, महिला मंडळ कोळगाव, सुर संगम भजनी मंडळ काळमाथा, सावता माळी मंडळ शिवली, संत तुकाराम भजनी मंडळ हरवाडी, कुलस्वामिनी महिला भजनी मंडळ मुरुड अकोला, जोड लिंगेश्वर भजनी मंडळ जवळा (बु), हनुमान भजनी मंडळ येलोरीवाडी, हनुमान भजनी मंडळ कवठाकेज, विठ्ठल रुक्मिणी मंडळ जवळगा, ज्योतिर्लिंग महिला मंडळ निवळी, महर्षी वाल्मिकी महिला मंडळ वाला, निळकंठेश्वर महिला मंडळ निळकंठ, प्रभाकर स्वामी महाराज महिला भजनी मंडळ भादा, माऊली भजनी मंडळ सेलू (बु), विठ्ठल रुक्मिणी भजनी मंडळ कुंभारी, संत तुकाराम भजनी मंडळ टाकळगाव, नरसिंह भजनी मंडळ गोढाळा, कुलस्वामिनी भजनी मंडळ मांजरी, निवृत्तीनाथ भजनी मंडळ ढोकी, श्री हनुमान भजनी मंडळ वडजी, विठ्ठल रुक्मिणी भजनी मंडळ गरसुळी, यासह विविध गावातील १०१ महिला भजनी मंडळांना भाजपा नेते आ. रमेशआप्पा कराड यांच्या हस्ते साहित्याचे वाटप करण्यात आले.

साहित्य वाटप कार्यक्रमास नामदेव बोबडे, दत्ता सरवदे, महादेव गुरुशेट्टे, पाटलोबा मुंडे संजय सावंत, अक्षय भोसले, संतोष चव्हाण, चंद्रकांत माने, शेख जलील, विष्णु शिंदे आत्माराम जाधव, संजय डोंगरे, संतोष जगताप, रवींद्र पाटील, हनुमंत कतलाकुटे, सोमनाथ वाघमारे, युवराज सुरवसे, दीपक पवार, प्रताप भुरे, अच्युत ईरपे, नितीन लोंढे, बाजीराव साखरे, श्रीनाथ बंडगर, नंदराम मल्हारी, रामकिशन गोरे यांच्यासह भजनी मंडळातील असंख्य महिला, भाजपाचे प्रमुख पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन चंद्रकांत कातळे, दिलीप पाटील यांनी केले.

## संपादकीय....

# प्रतिमेसाठी काहीही!

आदिशक्तीचा नऊ दिवसांचा उत्सव सुरू झाला. स्त्रीशक्तीचा सन्मान करताना, तिचा महिमा गाताना आता विजयादशमीपर्यंत कुणीच थकणार नाही. या पार्श्वभूमीवर, केवळ नऊ दिवसांच्या विश्रांतीसाठी एका महिलेला किती संघर्ष करावा लागला आणि तो कुठे जाऊन संपला, याची एक कहाणी सिंगापूरहून आली आहे. संबंधित महिलेनं घोडचूक केली; गुन्हा केला, हे मान्य करावंच लागेल. त्या गुन्ह्याची शिक्षाही तिला मिळाली आहे. परंतु तिच्यावर अशी वेळ का आली असावी, याचा विचार करणं आणि तिच्या अनुभवांच्या पार्श्वभूमीवर इथल्या स्त्रियांच्या परिस्थितीकडे नवरात्राच्या निमित्ताने डोळसपणे पाहणं सहज शक्य आहे.

सु किन नावाच्या या महिलेला बनावट कागदपत्रं तयार केल्याच्या गुन्ह्यासाठी पाच हजार सिंगापुरी डॉलर म्हणजेच सुमारे तीन लाख रुपयांचा दंड झालाय. रजा मिळवण्यासाठी तिने बनावट वैद्यकीय प्रमाणपत्र तयार केलं होतं. ती ज्या कंपनीत काम करत होती, त्या कंपनीच्या एचआर विभागानं हा प्रकार उघड केला. प्रकरण पोलिसात गेलं आणि सु किनला दंड झाला.

कहाणीची सुरुवात होते मार्च महिन्यापासून. सु किनला अस्वस्थ वाटत होतं. तिच्या आईची प्रकृतीही चांगली नव्हती. खरं तर हे कारण सांगून ती रजा मागू शकली असती. इथेच या कहाणीचा 'ट्रिगर पॉइंट' येतो. कारण इथेच कर्मचार्यांकडून केल्या जाणार्या अपेक्षा आणि त्यांच्याकडे पाहण्याचा दृष्टिकोन या महत्त्वाच्या बाबी उघड होतात.

खरं बोलून रजा मागितली, तर कंपनीतील आपली 'प्रतिमा' खराब होईल, अशी भीती ज्या क्षणी सु किनला वाटली, तिथेच कहाणीत 'ट्विस्ट' आला. एखादं मेडिकल सर्टिङ्गिकेट सादर करावं आणि रुग्णालयात भर्ती होण्यासाठी रजा मागावी, असा विचार तिच्या मनात घोळू लागला. वास्तविक, भर्ती होण्याइतकी ती आजारी नव्हती; परंतु काम करण्याच्या मनोशारीरिक अवस्थेतही ती नव्हती. शिवाय, आईच्या तब्येतीचं टेन्शन होतं. मग तिने एका जुन्या वैद्यकीय प्रमाणपत्रात ङ्गोटोशॉपच्या मदतीने काही ङ्गेरङ्गार केले. स्वतः सॉफ्टवेअर डेव्हलपर असल्यामुळं तिच्यासाठी ही बाब ङ्गारशी अवघड नव्हती.

हॉस्पिटलमध्ये भर्ती होण्याच्या कालावधीत २३ मार्च ते ३ एप्रिल असा बदल केला. हॉस्पिटलच्या नावात बदल करून क्यूआर कोडसुद्धा अस्पष्ट केला. ही बाब कंपनीच्या मनुष्यबळ विभागाच्या लक्षात आली आणि त्यांनी तिला मूळ प्रमाणपत्र मागितलं. मग तिने नवीन वेबसाइट तयार करून एक डुप्लिकेट क्यूआर कोड तयार केला आणि प्रमाणपत्र पुन्हा सादर केलं. तोही घोटाळा पकडला गेला. हा प्रयत्न ङ्गसल्यावर तिने ४ एप्रिलला नोकरीचा राजीनामा दिला आणि कंपनीने तिच्यावर केस ठोकली.

वास्तविक, अगदी साध्या कारणासाठी एवढा सगळा द्रविडी प्राणायाम करण्याची बिलकूल गरज नव्हती. परंतु 'अस्वस्थ वाटत असल्यामुळं रजा हवी,' असं सांगितलं तर रजा मिळते; पण 'प्रतिमा' खराब होते. आजच्या स्पर्धेच्या काळात या गोष्टीचा ङ्गायदा घेऊन कुणीतरी आपली प्रतिमा उजळवून घेतो. मग आपली 'ग्रोथ' मंदावते. या सगळ्या अपरिहार्यतांमुळं माणूस स्वतःचं शरीर यंत्रासारखं वापरत राहतो. महिलांच्या बाबतीत तर हा प्रश्न अधिकच गुंतागुंतीचा असतो. हे ओळखून त्यांच्याकडून अपेक्षा करणारे भेटतील, हीच अपेक्षा वेडगळपणाची!

# दु:खातून बाहेर काढण्यासाठी हसणे ही सर्वात मोठी शक्ती जागतिक स्मित हास्य दिवस

जागतिक हास्य दिनाची स्थापना १९९८ मध्ये करण्यात आली आणि पहिला उत्सव १० मे १९९८ रोजी मुंबई, भारत येथे साजरा करण्यात आला, ज्याची व्यवस्था जगभरातील हास्य योग चळवळीचे संस्थापक डॉ. मदन कटारिया यांनी केली होती. डॉ. कटारिया भारतातील एक फॅमिली डॉक्टर, चेहऱ्याच्या फीडबॅक हायपोथिसिस पासून प्रेरणा घेऊन ते म्हणाले की, चेहऱ्याच्या हालचालींचा माणसाच्या भावनांवर प्रभाव पडतो. चेहऱ्यावरील अभिप्राय गृहीतकाने हशा योग चळवळ सुरू करण्यास प्रेरित झाले होते, ज्यात असे मानले जाते की एखाद्या व्यक्तीच्या चेहऱ्यावरील हावभावांचा त्यांच्या भावनांवर परिणाम होऊ शकतो. जागतिक हास्य दिन साजरा करणे हे जागतिक शांततेसाठी एक सकारात्मक प्रकटीकरण आहे आणि हास्याद्वारे बंधुता आणि मैत्रीची जागतिक जाणीव निर्माण करण्याचा हेतू आहे. हा बहुतेक वेळा हसण्याच्या एकमेव उद्देशाने सार्वजनिक ठिकाणी लोकांच्या मेळाव्याद्वारे साजरा केला जातो. त्याची लोकप्रियता झपाट्याने वाढली आहे. लाफ्टर योग चळवळीसह आता ११५ हून अधिक देशांमध्ये हजारो लाफ्टर क्लबची गणना केली जात आहे आणि आता तो जगभरात साजरा केला जातो.

निरोगी राहण्यासाठी केवळ निरोगी आहार आणि व्यायाम करणे महत्त्वाचे नाही तर तणावमुक्त जीवन जगणे देखील महत्त्वाचे आहे. तणावामुळे अनेक आजारांचा धोका अनेक पटींनी वाढतो आणि त्यामुळेच लोक तणाव कमी करण्यासाठी लाफ्टर थेरपीसारख्या तंत्राची मदत घेतात. लोकांमध्ये एकता आणि सद्भावना वाढवणे तसेच लोकांमध्ये आनंद वाटून घेणे हा दिवस साजरा करण्यामागे उद्देश आहे. एवढेच नाही तर हसण्याने तुमचे आरोग्यही निरोगी राहते. म्हणूनच अनेक लोक सकाळी किंवा संध्याकाळी उद्यानांसारख्या ठिकाणी जमतात आणि जोरात हसतात. तणाव कमी करण्यासाठी हसणे फायदेशीर ठरते, तुमचा मूड चांगला राहतो. तसेच मानसिक आरोग्य देखील निरोगी राहते आणि सकारात्मक उर्जा वाढते. त्यामुळे मित्र, सहकारी आणि कुटुंबातील सदस्यांसोबत हसण्यानेही भावनिक नाते संबंधात सकारात्मकता येते व शरीराची रोगप्रतिकारक शक्ती मजबूत होते. कारण ते तणाव संप्रेरक कमी करून तुमचा कामावरचा फोकस ही वाढतो त्यामुळे आनंदी हार्मोन्स बाहेर पडतात व तुम्हाला फ्रेश वाटते. हसल्याने आयुष्य चार पट वाढतं. प्रत्येकाच्या आयुष्यात अनेक समस्या असतात पण हसल्याने त्या समस्या कमी होण्यास मदत होते. अशा परिस्थितीत हा दिवस अधिक खास बनवण्यासाठी, तुम्ही तुमच्या मित्रांना काही हास्य आणि प्रेमाने भरलेले संदेश पाठवू शकता.

हसणं हे नैसर्गिक ताण कमी करणारं आहे. एक चांगले हसणे एंडोर्फिन सोडते, ती फील-गुड रसायने जी तणाव हार्मोन्सचा सामना करतात. अधिक रिलॅक्स टीम हा एक आनंदी आणि निरोगी टीम असते. टीम बिल्डिंगपासून ते ताणतणाव दूर करण्यापर्यंत आणि चांगल्या समस्या सोडविण्यापर्यंत चांगले हास्य हे चांगली उत्पादकता वाढवू शकते. हसणं किंवा हास्य शेअर केल्याने नातं आणि मैत्रीची भावना निर्माण होते. यामुळे आपलेपणाची भावना वाढते आणि टीममधील संबंध दृढ होतात. कोणत्याही दु:खातून किंवा दुःखातून बाहेर काढण्यासाठी हसणे आणि आनंद ही सर्वात मोठी शक्ती आहे. हसण्यामुळे तणाव कमी होतो आणि अधिक निवांत वातावरण वाढते. यामुळे विचारांचा मुक्त प्रवाह होऊ शकतो आणि क्रिएटिव्ह विचारांना चालना मिळू शकते. ज्यामुळे समस्या सोडविणे आणि नाविन्यपूर्ण काम होऊ शकते. हसणे कठीण संभाषणादरम्यान तणाव कमी करू शकते आणि लोकांना नवीन कल्पनांसाठी उघडू शकते. हे विश्वास आणि सामंजस्य निर्माण करण्यात देखील मदत करू शकते. ज्यामुळे स्पष्ट संवाद आणि चांगले सहकार्य होते.

अभ्यासातून असे दिसून आले आहे की हसणे खरोखर उत्पादकता वाढवू शकते. एक निवांत आणि आनंदी टीम त्यांच्या कामात लक्ष केंद्रित आणि व्यस्त असण्याची शक्यता जास्त असते. हसणे हे एक नैसर्गिक रिलॅक्स तंत्र आहे. हे स्नायू सैल करण्यास, रक्तदाब कमी करण्यास आणि तणाव कमी करण्यास मदत करते. एक रिलॅक्स टीम आव्हाने हाताळण्यासाठी आणि दिवसभर एकाग्र राहण्यासाठी अधिक सुसज्ज असते. दिवसाच्या सुरुवातीला आपण हसणे किंवा हास्य शेअर केले तर ते उर्वरित कामाच्या दिवसासाठी सकारात्मक टोन सेट करते. ही सोपी कृती आशावादाची भावना वाढवते आणि आपल्या टीमला अधिक सकारात्मक दृष्टिकोनासह आव्हानांना सामोरे जाण्यास मदत करू शकते. आज बऱ्याच कार्यसंस्कृतींमध्ये सहकार्यांशी जवळीक साधणे आणि त्यांच्याशी जुळवून घेणे हा दिवसाची सुरुवात करण्याचा एक योग्य मार्ग आहे! तसं अजूनही काही ठिकाणी हसण्याचा विसर पडलेला दिसतो. लोक ऑफिसमध्ये धावत येतात आणि कामाला सुरुवात करतात आणि क्वचितच हसण्यासाठी एखादा क्षण शेअर करतात. पण विशेषत: दिवसाच्या सुरुवातीला हसायला विसरणे ही एखादी संधी गमावल्यासारखे आहे, असे मत प्रोफेशनल सर्टिफायड लाइफ कोच आणि नवी दिल्ली येथील कोकोवेव्ह कोचिंग इंटरनॅशनलचे सहसंस्थापक हनी गुध यांनी सुद्धा व्यक्त केले. सर्व हास्य प्रेमींना ऋजागतिक हास्य दिनाऋच्या हार्दिक शुभेच्छा!

*********

प्रवीण बागडे
नागपूर
भ्रमणध्वनी: ९९२३६२०९१९

# सामाजिक दिवाळी निमित्त पुस्तक संकलन मोहीम चे महाराष्ट्र भर आयोजन.

आतापर्यंत तुम्ही रक्तदान,अवयव दान,नेत्रदान,श्रमदान, याबद्दल बरचं ऐकलं असेल आणि माहीती सुद्धा असेल. पण पुस्तक संकलन मोहीम-२०२४ ऐकून जरा आश्चर्यच वाटले असेल हो ना. मागील ११ वर्षापासुन स्वामी विवेकानंद ग्रुप ऑफ ऑर्गनायझेशन च्या माध्यमातून महाराष्ट्रभर वाचन संस्कृती चे संवर्धन करण्यासाठी तसेच विद्यार्थ्यांमध्ये शालेय जीवनापासून वाचनाची आवड निर्माण करण्यासाठी वाचनालय चळवळ सुरू आहे. दरवर्षी स्वामी विवेकानंद ग्रुप ऑफ ऑर्गनायझेशन मार्फत सामाजिक दिवाळी या उपक्रमाअंतर्गत पुस्तक संकलन मोहीम राबविण्यात येते.या मोहिमेअंतर्गत जमा झालेल्या पुस्तकांच्या माध्यमातून गाव तिथं वाचनालय हा उपक्रम राबवित आहोत.आम्ही अनुभवत आहोत या गोष्टीमुळे विद्यार्थांना वाचनाची आवड निर्माण होत आहे ,वाचनसंस्कृती ची जोपासना होत आहे आणि सामाजिक-शैक्षणिक परिस्थिती ही सुधारत आहे. पुस्तक संकलन मोहीम च्या माध्यमातून स्वामी विवेकानंद ग्रुप ऑफ ऑर्गनायझेशन ने अकोला जिल्हाभर जवळपास १०० च्यावर वाचनालयाची स्थापना केली आहे. पुस्तक संकलन मोहिमेच्या माध्यमातून आजपर्यंत स्वामी विवेकानंद ग्रुप ऑफ ऑर्गनायझेशन ने जवळपास ८५ हजार च्यावर पुस्तके ग्रामीण भागातील गरीब-गरजू-हुशार विद्यार्थ्यांना वितरित केली आहेत. वाचनध्यास,गाव तिथं वाचनालय,पुस्तकबँक इ.उपक्रमाच्या माध्यमातून पश्चिम विदर्भामध्ये वाचनसंस्कृती संवर्धनाचे कार्य ग्रुपकडून ११ वर्षांपासून युद्धपातळीवर सुरू आहे. आपल्या या पुस्तक संकलन मोहिम मध्ये आपण प्रत्येक जण अपणाकडून नविन पुस्तक देऊन/आपल्याकडील जुनी वाचनयोग्य पुस्तके देऊन तसेच पुस्तकांसाठी आर्थिक सहकार्य देऊन सहभागी होऊ शकतात, असे आवाहन स्वामी विवेकानंद ग्रुप ऑफ ऑर्गनायझेशन चे अध्यक्ष प्रा. राजेश पाटिल ताले यांनी केले आहे.तुमचे १ पुस्तक कित्येकांचे आयुष्य घडवू शकते)

******


एक पाऊल समाजासाठी...
एक पाऊल शिक्षणासाठी...
एक पाऊल समाज प्रबोधनासाठी

# 'पॉलिग्राफ'तही सत्य दडवता येते?

गुन्ह्याबाबत संशयित आरोपीविरोधात भक्कम पुरावा मिळत नसेल, तर अशा वेळी आरोपीची पॉलिग्राफ चाचणी करण्यात येते. मात्र, यातही काही पळवाटा असतात का? एखाद्या गुन्ह्याचा शोध लवकर लागत नसेल, तर पोलीस यंत्रणा वेगवेगळ्या माध्यमातून आरोपींपर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न करत असतात. हत्या, बलात्कार, चोरी, दरोडा, ङ्गसवणूक, अपहरण, खंडणी, दहशतवादी हल्ला यासारख्या गुन्ह्यात काही वेळा तपास लवकर लागतो, तर काहीवेळा सहजासहजी पुरावे हाती लागत नाही. अशावेळी नार्को टेस्ट, पॉलिग्राङ्ग चाचणी किंवा क्राइम सीन यासारख्या माध्यमातून शोध घेण्याचा प्रयत्न केला जातो. पॉलीग्राङ्ग चाचणी म्हणजे काय? ङ्गॉरेन्सिक सायकोलॉजी विभागाचे प्रमुख डॉ. पुनीत पुरी यांच्या मते, पॉलिग्राङ्ग चाचणीसाठी कोर्टाकडून परवानगी घ्यावी लागते. पॉलिग्राङ्ग चाचणी ही नार्को चाचणीपेक्षा वेगळी असते. यात आरोपीला बेशुद्ध करण्याचे इंजेक्शन दिले जात नाही. उलट कार्डिओ कङ्गसारख्या मशीनचा वापर केला जातो. या मशीनच्या माध्यमातून रक्तदाब, नाडी, श्वास, घाम, रक्तप्रवाह याचे आकलन केले जाते. यानंतर आरोपीला प्रश्न विचारण्यात येतात. खोटे बोलल्यास तो भयभीत होतो आणि त्याचवेळी मशीन हे शरीरातील बदल हेरते. याप्रकारच्या चाचणीचा प्रयोग पहिल्यांदा १९व्या शतकात इटलीतील गुन्हे संशोधक सेसारे लोम्बोसो यांनी केला होता. त्यानंतर १९१४ मध्ये अमेरिकी मानसशास्त्रज्ञ विल्यम मेरस्ट्रॉन आणि १९२१ मध्ये कॅलिङ्गोर्नियाचे पोलीस अधिकारी जॉन लार्सन यांनी देखील अशाच प्रकारचे उपकरण तयार केले. चाचणीतील पुरावा उपयुक्त? २०१०मध्ये एका खटल्याच्या सुनावणीत सर्वोच्च न्यायालयाने मांडलेल्या मतानुसार, पॉलिग्राङ्ग चाचणीदरम्यान आरोपींनी मांडलेली मते ही पुरावा म्हणून ग्राह्य धरली जाणार नाहीत. उलट ते पुरावे गोळा करण्याचा एक मार्ग असू शकतो. असे समजा की जर पॉलिग्राङ्ग चाचणीत हत्या प्रकरणातील आरोपी गुन्ह्यात वापरलेल्या शस्त्राचे ठिकाण सांगत असेल तर त्याला पुरावा मानता येणार नाही. परंतु आरोपीने सांगितलेल्या ठिकाणी शस्त्र सापडत असेल, तर त्याला पुरावा म्हणून ग्राह्य धरले जाईल. पण न्यायालय असेही म्हणते, की अशा चाचण्यांच्या माध्यमातून एखाद्या व्यक्तीच्या खासगी आयुष्यात मानसिक प्रक्रियेच्या मदतीने जबरदस्तीने घुसखोरी करणे हे त्याच्या स्वातंत्र्याचे आणि मूलभूत हक्काच्या विरोधात आहे. या पार्श्वभूमीवर न्यायालयाच्या परवानगीनंतरच अशा प्रकारची चाचणी करण्यास परवानगी दिली जाते. पॉलिग्राङ्ग मशीन कसे काम करते? एका पॉलिग्राङ्ग मशीनमध्ये सेन्सरयुक्त अनेक भाग असतात. सेन्सरने नोंदलेल्या सर्व माहितीची एकाचवेळी पडताळणी केली जाते आणि त्याचा सायकॉलॉजिकल रिस्पॉन्स शोध घेण्यात येतो. एखादी व्यक्ती खोटं बोलत असेल, तर त्याच्या मनात धाकधूक वाढते. अशावेळी हा मानसिक आणि शारीरिक बदल हेरण्याचे काम मशीन करते. मशीनच्या कामाची पद्धत पाहू.

# राजकारण,राज्यकर्ते व राज्यकारभार!

राजकारण म्हणजे काय?.तर सर्वच स्तरावर देशाचे व्यवहार व्यवस्थापित करण्यासाठी आर्थिक,राजकीय आणि प्रशासकीय अधिकाराचा वापर करून कारभार करणे म्हणजे राजकारण.काही अभ्यासकांच्या मते,राजकारण हे समाजाचे शास्त्र,राज्य कलेचे मानसशास्त्र आणि राजकारणाची प्रक्रिया आहे.काहीच्या मते राजकारण म्हणजे शब्द या शस्त्राचा वापर करुन रक्ताचा थेंब न सांडता केलेले युद्ध.राजकारण म्हणजे सत्ता हस्तगत करणे नाही तर जनतेच्या गरजा पूर्ण करण्यासाठी आणि देशहिताचा निर्णय घेऊन,विकासाच्या दृष्टीने सुधारणा घडवून आणण्यासाठी प्रयत्न करणे म्हणजे राजकारण.काही अभ्यासकांच्या मते संविधानाच्या चौकटीत राहून राज्यकारभार करणे म्हणजे राजकारण.




शासनाच्या योग्य पद्धती व मानवी समाजाचे योग्य व्यवस्थापन करण्यासाठी व सरकारी निर्णय घेण्याची क्षमता,तसेच नियम व कायदे करणे म्हणजे राजकारण. राजकारण म्हणजे फक्त सत्तेसाठीच संघर्ष नसावा किंवा केवळ स्वार्थ साधने नसावा. तर जनहिताच्या दृष्टीने,देश हिताच्या,व विकासाच्या दृष्टीने कामे असावी.पण सध्याच्या काळात राजकारणाची व्याख्या भ्रष्टाचार,घोटाळे,लाच,शिफारस,लुट ारु,गुंडगिरी अशीच झालेली आहे.सध्याचे राजकारण हे नीतिमत्ताच हरवलेले राजकारण झाले आहे. नीतीमत्ताच राहीली नाही.अशी परिस्थिती आहे.फक्त एकमेकांशी वाद,विवाद,एकमेकावर आरोप प्रत्यारोप,विरोध,व मंत्रीपदासाठी, सत्ता मिळण्यासाठी या पक्षातून त्या पक्षात,त्या पक्षातून या पक्षात,किती स्वार्थीपणा, लोभीपणा,ढोंगीपणा लोकांनी आपल्याला समस्या सोडविण्यासाठी,जनहितासाठी, विकास करण्यासाठी निवडून दिले,हे सगळे विसरुन जायचे,त्याचे काही घेणेदेणे नाही. अशी परिस्थिती आहे.

जनतेंनी निवडून दिल्यावर राज्यकर्त्यांचे काम असते,राज्याच्या कारभाराचे नियंत्रण आणि व्यवस्था राखणे व सर्वांच्या हिताचे योग्य वेळी योग्य निर्णय घेणे याला म्हणतात राज्य कारभार करणे. पण आता परिस्थिती उलट आहे.बिकट आहे,मुळ मुद्दे बाजुला सारून,जसे (पाणी,विज,रस्ते,शेती,शिक्षण,उद्योग,गरीबी,बेकारी, वैद्यकिय जनतेच्या समस्या,देशहिताची,विकासाची कामे) यांच्या भ्रष्टाचाराच्या,घोटाळ्याच्या,व फोडाफोडीच्या राजकारणाच्याच जिकडे तिकडे बातम्या.व चर्चा.एकप्रकारे राजकारणाचा धिंगाणा झाला आहे.भ्रष्ट लोकाच्या हाती राज्यकारभार असणे हे लोकहिताला बाधक आहे.त्यामुळे विकासाची व जनहिताची कामेच होत नाहीत.म्हणून परत परत त्याच त्या लोकांच्या हाती सत्ता देणे चुकीचे आहे.जनतेने सत्तेत बदल, परिवर्तन करावे.जेणेकरुन देशहिताला,विकास कामाला चालना मिळेल.

भारत देशाला खूप चांगले राजे, महाराजे, संत महापुरुष,महमानवांच्या कार्यकर्तृत्वाचा,आदर्श विचाराचा वारसा लाभलेला असतांना इथल्या राज्यकर्त्यांनी तो आदर्श घेऊ नये यापेक्षा दुर्दैव काय असणार!.इतिहासात डोकावून पाहिले तर काही राजांचा आदर्श आमच्या राज्यकर्त्यांनी घेण्यासारखा आहे.मौर्य सम्राट अशोकाच्या राज्यकारभाराचा काळ एकमेव असा अतिशय महत्त्वाचा, स्वातंत्र्याचा,वैभवाचा काळ!की त्यांच्या काळात प्रजा सुखी आनंदी जीवन जगत होती, अन्याय अत्याचाराला अजिबात थारा नव्हता,सुखी संपन्न व लोककल्याणकारी राज्य होते.दुसरे राजे शिवाजी महाराज यांनी पण राज्य कारभार कसा करावा आदर्श घालून दिला.त्यांच्या काळात शेतकरी समाधानी,सदनहोता.अत्याचारनव्हते.महिला सुरक्षित होत्या.सर्वच जातीधर्माच्या लोकांना महाराजांनी जवळ केले होते.

शेरशाह सुरी १५४० ते १५४५ या पाच वर्षात खुप चांगल्या कार्याची इतिहासात नोंद आहे. रस्ते बनवले, बांगलादेश पासून तर दिल्ली काबूल पर्यंत,ग्रँटटँक रोड ज्याला आम्ही म्हणतो तो रोड याच राजाने बनवला. न्यायप्रधान राजा म्हणून त्यांची नोंद आहे. त्यांच्या राज्यात अन्याय,अत्याचाराला थारा नव्हता.या राजे लोकांच्या आदर्शासोबतच उत्तमोत्तम असलेली भारताची राज्यघटना आहे.राज्यकर्त्यांनी कारभार कसा करावा, त्याकरिता काही मार्गदर्शक तत्त्वे घटनाकारांनी राज्यघटनेत दिली आहेत. त्याप्रमाणे (राज्यघटनेनुसार) कारभार केला तर नाहीच,उलट त्यात प्रमाणाच्या बाहेर दुरुस्त्या करुन कारभार केला आणि समस्यां मिटवण्याऐवजी समस्यां वाढवल्या.आता आभाळ फाटलं कुठे कुठे थिगळ लावायच अशी परिस्थिती झाली.

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी घटना समर्पित करताना एक इशारा दिला होता.घटना कितीही चांगली असो,पण ती चालवणारे लोक जर प्रामाणिक नसतील तर घटना कुचकामी ठरेल.आणि घटना कशीही असो तिला चालवणारे लोक जर प्रामाणिक लोक असतील तर,घटना यशस्वी होईल.पण आम्ही मात्र जे करायला पाहिजे होते ते केले नाही.आणि जे नाही करायला पाहिजे होते तेच केले.म्हणून देश स्वतंत्र होऊन ७५वर्ष झाले,पण गेल्या ७५ वर्षांत देशातील ना गरीबी दुर झाली,फक्त गरीबी हटावाचे फक्त नारे दिल्या गेले.ना बेरोजगार युवकांना योग्य काम मिळाले,ना बेकारी मिटली,ना भ्रष्टाचार नाहीसा झाला,घोटाळे बंद झाले,ना दर्जेदार शिक्षणाच्या सोई सुविधा उपलब्ध झाल्या,ना रस्ते दुरुस्त झाले,ना शेतकरी समाधानी झाला,ना मजुरांच्या हाताला काम मिळाले,आजही कितीतरी ठिकाणी मजुरांचे शोषण केल्या जाते,अशी परिस्थिती आहे.ना धान्य साठवण्यासाठी गोदाम बांधल्या गेली,आजही प्रायव्हेट गोदाम भाड्याने घ्यावे लागतात.तेही वेळेवर भेटन नाही.त्यामुळे कितीतरी धान्य वाया जाते.अशी परिस्थिती आहे.ना अन्याय अत्याचार मिटला,दरोरोजच्या वर्तमानपत्रात अन्याय,अत्याचाराच्या घटना पाहायला मिळतात.म्हणून आजही लोक म्हणतात यांच्या पेक्षा इंग्रजांचे राज्य बरे होते.कामात एकनिष्ठपणा होता.योग्य न्याय मिळत होता. भ्रष्टाचार नव्हता,घोटाळे नव्हते,त्यांनी बांधलेले रस्ते,पुल,इमारती आजही जशाच्या तशा आहेत.त्यांच्या प्रामाणिकपुर्वक केलेल्या कामाचा तो पुरावा आहे. की जे आजही मजबूत आहेत.त्यांच्या कामात नीतीमत्ता होती.

आम्ही बांधलेले पुल,रस्ते, इमारती त्याला काही वर्षांतच तडे जातात,भेगा पडतात, कोसळतात,वाहून जातात,अशी परिस्थिती आहे.कारण कोणतेही काम आमच्या देशात प्रामाणिकपणे होत नाही किंवा केल्या जात नाही.कारण हजारो कोटी रुपयांचे भ्रष्टाचार व घोटाळे करणारे लोकच जर राजकारणात असतील,तर यातुन प्रामाणिक पणाचा संदेश थोडी जनतेत जाईल,भ्रष्टाचाराचाच संदेश जाईल ना. मग लोक म्हणतात राज्यकारभार करणारेच तर घोटाळे व भ्रष्टाचार करतात,तर खाली काय प्रामाणिकपणे काम होईल.आणि ते शंभर टक्के खरे आहे.समजा एखाद्याने प्रामाणिकपणे कामाला सुरुवात केलीही तर त्यात बाधा आणणारे अनेकजन असतात.अशी परिस्थिती आहे.

इंग्रजांनी १५० वर्ष भारतात राज्यकारभार केला या कालखंडात त्यांनी देशातील खुप संपत्ती लुटून नेली यात काही शंका नाही.पण त्यांच्या मुळे आपल्याला खूप काही गोष्टींची ओळख झाली,त्यांनी केलेल्या कायद्यामुळेअनिष्ट चालीरीती,प्रथा बंद झाल्या. देशात काही सुधारणा पण घडुन आल्या.हेही नाकारता येणार नाही.म्हणुन राजाराम मोहन रॉय म्हणत इंग्रजांचे राज्य म्हणजे देवाचे राज्य



डॉ.बाबासाहेब आंबेडकर सुध्दा आपल्या शोधप्रबंधात लिहितात की, इंग्रजांचे आपण ऋणी राहायला पाहिजे ते आर्थिक क्षेत्राव्यतिरिक्त इतर क्षेत्रातील त्यांच्या योगदानाबद्दल. कायदा व सुव्यवस्था,पाश्चिमात्य शिक्षणाची ओळख,विद्यापीठे, न्यायालयीन व प्रशासकीय स्वरूपाच्याआधुनिकसंस्थाचीउभारणी,याबद्दल. आम्ही तर स्थानिक,स्वकीय याच देशाचे रहिवासी, मालक आहोत,तरी आम्ही आमच्याच देशात एवढा भ्रष्टाचार,एवढे घोटाळे करावे, देशाला सुजलाम सुफलाम करण्याऐवजी परकीय लोकांसारखे लुटावे,हे कितपत योग्य आहे!.आपल्या देशात सुधारणा व्हाव्यात असे आपणास नागरिक,मतदार म्हणून का वाटू नये. ते वाटावे,ही अपेक्षा का नाही.

*************

विनोद सरदार ९६८९८४७११५,
तेल्हारा,जिल्हा अकोला
फुले आंबेडकर विद्वत सभा.

# केज विधानसभा मतदार संघात रा.स्व.संघ देणार भाजपला उमेदवार

**भाजपची बैठक संपन्न तसेच रा.स्व.संघाची बैठक संपली,आता भाजपचा उमेदवार रा.स्व. संघातून येणार.**

केज/प्रतिनिधी केज विधानसभा मतदार संघ निवडणुकीत एक नवीन माहिती समोर आली असून भारतीय जनता पार्टीचा उमेदवार हा राष्ट्रीय स्वयंसेवक संघा च्या माध्यमातून येणार असल्याची चर्चा जोर धरू लागली असून नुकतीच सर्वपित्री आमावस्येला भाजपची बैठक केज येथील शासकीय विश्राम गृह येथे संपन्न झाली या बैठकीला आ.मुंदडा समर्थक फक्त बोलावले असल्याचे समजते या बैठकीतून खा.गोपछडे यांच्यासमोर विद्यमान आमदाराचे चांगले प्रदर्शन दाखवण्यासाठी फक्त त्यांच्या विषयी भरभरुन बोलणारेच बोलावले असल्याचे समजते तर त्याच दरम्यान एका ठिकाणी राष्ट्रीयस्वयंसेवक संघाची बैठक देखील मतदार संघात झाली.या बैठकीत केज विधानसभा मतदार संघाचा उमेदवार हा संघ देईल असे ठरले. कारण विद्यमान आमदार यांनी मागील पाच वर्षात संघाच्या कार्यकर्त्यांना विचारले देखील नाही व मतदार संघात सामान्य जनतेला खूप त्रास झाला असल्याचा रोष विद्यमान आमदारावर असल्यामुळे संघांचे कार्यकर्तेच आत्ता भाजपला उमेदवार देतील असे समजते.खूप मोठी जय्यत तयारी करून खा. गोपछडे यांच्या नेतृत्वात भाजपची मतदार संघाची बैठक घेण्यात आली. यामध्ये जे फक्त आ.मुंदडा यांच्या बद्दल जे चांगले सांगतील असेच बोलावले होते.त्यातही सगळ्यांनी त्यांना काय सांगायचे हे पाठांतर करून घेतले असल्याचेसमजते.त्यामुळे खा.गोपछडे,डॉ.धर्मपात्रे व इतर काहीजण या बैठकी चा रिपोर्ट पक्षाला पाठवतील व त्यानंतर उमेदवार ठरवला जाईल असे सर्वसाधारणपणे ठरले असावे.परंतु जर पक्षाच्या इतर लोकांना विचारायचे न्हवते तर बैठक घ्यायचे नाटक पण करायला नको होते अशी चर्चा आहे.त्याच बरोबर मतदार संघात एका ठिकाणी राष्ट्रीयस्वयंसेवक संघाच्या कार्यकर्त्यांची बैठक पार पडली.यामध्ये बहुतांश संघ कार्यकर्ते यांनी आपले मत मांडले यात विद्यमान आमदार यांच्या कार्याविषयी रोष व्यक्त केला व या बैठकीत संघ आपला कार्यकर्ता भाजपला देईल असे ठरले असल्याचे समजते.जर भाजपने उमेदवार नाही बदलला तर संघ नक्कीच भाजपचे काम करणार नाही हे मात्र नक्की दिसुन येत आहे. आता मतदार संघात विद्यमान आमदार नको असा सुर उमटत असल्याचे दिसुन येत आहे

# आपल्या हिताच्या मेळाव्यात या!

जालना : दसरा मेळाव्याला तुफान गर्दी होणार आहे. हा मेळावा पारंपारिक होणार आहे, जातीचा आणि राजकारणाचा काही संबंध नाही. खूप दिवसांनी इच्छा पूर्ण झाली म्हणून संपूर्ण ताकदीने लोक येणार असून ५० ते ५५ हजार फक्त स्वयंसेवक आहेत. दु:खापासून समृद्धीकडे जाण्यासाठी मेळाव्याचे आयोजन केले आहे. सगळ्या पक्षाच्या कार्यकर्त्यांनी या मेळाव्याला यायला पाहिजे कारण हा सामाजिक मेळावा आहे. राजकीय पक्षाच्या मेळाव्याला पळण्यापेक्षा आपल्या हिताच्या मेळाव्याला या, असे आवाहन मराठा आरक्षण नेते मनोज जरांगे यांनी आज केले. त्यांनी अंतरवाली सराटीत प्रसार माध्यमांशी संवाद साधला. मनोज जरांगे पुढे म्हणाले, एका तासात मराठा आणि कुणबी एकच आहे असा शासन निर्णय होऊ शकतो. असे घडले आहे. या अगोदर. तिन्ही गॅजेट आज लागू होऊ शकतात. मर्यादा वाढायचे ठरले तर एका दिवसात होऊ शकते.

# हातचलाखी करून सोन्याचे दागिने चोरणाऱ्या महिलेला १ लाख ३३ हजार रुपयाच्या मुद्देमालासह अवघ्या १० दिवसात अटक. स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई.

लातूर :- हातचलाखी करून सोन्याचे दागिने चोरणाऱ्या महिलेला १ लाख ३३ हजार रुपयाच्या मुद्देमालासह अवघ्या १० दिवसात अटक.

याबाबत थोडक्यात माहिती की, लातूर शहरातील पोलीस ठाणे शिवाजीनगर हद्दी मध्ये एका सोन्या-चांदीचे दुकानातून दोन बुरखा परिधान केलेल्या महिलांनी हातचालाखी करून १८ ग्रॅम वजनाचे एक लाख ३३ हजार रुपयाचे सोन्याचे नेकलेस चोरल्याची घटना घडली होती. त्यावरून पोलीस ठाणे शिवाजीनगर येथे अज्ञात बुरखा परिधान केलेल्या महिला विरुद्ध चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला होता .

पोलीस अधीक्षक सोमय मुंडे ,अपर पोलीस अधीक्षक डॉ.अजय देवरे, यांचे मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संजीवन मिरकले यांचे नेतृत्वात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस अधिकारी व अमलदारांचे पथक तयार करून नमूद गुन्ह्याचा तपास करण्यात येत होता. सदर पथकाला सखोल मार्गदर्शन व सूचना आल्या होत्या. सदर पथकाकडून गुन्ह्या संदर्भात बारकाईने तपास सुरू असताना मोठ्या प्रमाणात बातमीदार नेमून मिळालेल्या माहितीचे विश्लेषण करून अज्ञात आरोपींचा शोध घेण्यासाठी परिश्रम घेण्यात येत होते.

वरिष्ठांचे मार्गदर्शनात सदरच्या पथकांनी केलेल्या परिश्रमामुळे पथकांना गुप्त बातमीदाराकडून हातचालाखी करून सोन्या-चांदीच्या दुकानातून दागिने चोरणाऱ्या महिला संदर्भात माहिती मिळाली की, नमूद चोरीतील महिला गुन्हेगार त्याने चोरलेला सोन्याचा मुद्देमाल विकण्यासाठी एक बुरखापरिधान केलेली महिला बसस्थानक ते गांधी चौक जाणारे रोडवर थांबलेली आहे. सदर माहितीची खातरजमा करून सदरचे पथक तात्काळ नमूद परिसरात सापळा लावून संशयित महिलेला ताब्यात घेतले.

सदर पथकाने अतिशय कुशलतेने सराफा दुकानातून हातचालाखी करून सोन्याचे दागिने चोरणाऱ्या महिला आरोपीला दिनांक ०३/१०/२०२४ रोजी ताब्यात घेऊन त्याच्याकडे विचारपूस केली असता त्यांनी त्यांचे नाव १) नाझिया मुकद्दर काजी उर्फ नाझिया आसिफ शेख, वय ३७ वर्ष, राहणार पाण्याचे टाकी, पोलीस चौकी जवळ, शांतीनगर, सोलापूर. असे असल्याचे सांगितले.

महिला पोलीस अंमलदार मार्फत सदर महिलेच्या ताब्यात असलेल्या प्लास्टिक पिशवीची झडती घेतली असता त्यामध्ये सोन्याचे एक नेकलेस मिळून आले. त्याबाबत त्याच्याकडे विचारले तेव्हा त्याने त्याची आई मुमताज नजीर शेख,वय ६० वर्ष, राहणार मलिकार्जुन नगर, वेलकम हॉल जवळ, सोलापूर असे दोघी मिळून १० ते १२ दिवसापूर्वी लातूर शहरातील एका सराफा दुकानातून हात चालाखीने एका घराचे सदरचा सोन्याचा नेकलेस चोरून ते आज रोजी विक्री करणार होती असे कबूल केले.

त्यावरून नमूद महिलेला त्याने चोरलेला ०१ लाख ३३ हजार रुपये किमतीचा सोन्याचा नेकलेस सह ताब्यात घेऊन पुढील कारवाई करिता पोलीस ठाणे शिवाजीनगर यांचे ताब्यात देण्यात आले आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरिष्ठांचे मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलीस पथकाने अतिशय उत्कृष्टरित्या तपास करून हात चालाखी करून सोन्याचे दागिने चोरणाऱ्या बुरखा परिधान केलेल्या महिला आरोपीला ताब्यात घेऊन त्यांच्याकडून चोरलेला मुद्देमाल १०० टक्के हस्तगत केला आहे. सदरची कारवाई पोलीस अधीक्षक सोमय मुंडे, अपर पोलीस अधीक्षक डॉ. अजय देवरे, मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संजीवन मिरकले यांच्या नेतृत्वातील पथकामधील पोलीस अमलदार संजय कांबळे, युवराज गिरी, जमीर शेख, सचिन धारेकर, महिला पोलीस अंमलदार घनघावे, भुसे यांनी केली आहे.

# कलावंतांच्या न्याय हक्कासाठी केज तहसीलवर कलावंतांचा जागर

**लाडकी बहीण योजनेच्या धरतीवर लाडके कलावंत योजना सुरू करा-अनिल वैरागे**



केज/प्रतिनिधी कलावंतांच्या विविध मागण्यासाठी दिनांक ४ ऑक्टोबर२०२४ रोजी छत्रपती शिवाजी महाराज चौक ते तहसील कार्यालयापर्यंत शेकडो कलावंतांच्या उपस्थितीमध्ये राष्ट्रीय पुरोगामी पत्रकार संघ संलग्न कला क्रीडा विश्व समितीच्या वतीने वाजत गाजत जागर करत निवेदन देण्यात आले.

या निवेदनामध्ये कलावंतांच्या विविध मागण्या जसे की, लाडकी बहीण योजनेच्या धर्तीवर लाडके कलावंत योजना सुरू करणे, बस प्रवास मोफत करणे, कलावंतांना स्वतंत्र घरकुल योजना लागू करणे, कलावंतांना विमा सुरक्षा लागू करणे आणि कलावंतांना मानधन सुरू करण्यापूर्वी त्या कलाकाराचे वय व कलाकारांची परीक्षा घेऊनच मानधन सुरू करण्यात यावे अशा विविध मागण्यांचा उल्लेख होता महाराष्ट्र ही कलावंतांची आणि संतांची भूमी आहे आपल्या लोककलेच्या माध्यमातून मनोरंजनाबरोबरच कलेचा वारसा पुढे चालवणारे तमाम महाराष्ट्रातील कलावंत हे सरकारी योजनेपासून वंचित आहेत म्हणून पुरोगामी पत्रकार संघ जिल्हा प्रमुख दत्तात्रय यांच्या मार्गदर्शनाखाली कला क्रीडा विश्व समितीचे तालुकाध्यक्ष अनिल वैरागे यांच्या नेतृत्वाखाली शेकडो कलावंतांच्या उपस्थितीमध्ये तहसीलदार यांच्यामार्फत मुख्यमंत्री यांना निवेदन केज तालुका कला क्रीडा विश्व समितीच्या वतीने निवेदन देण्यात आले.

यावेळी पुरोगामी पत्रकार संघाचे जिल्हाध्यक्ष तथा राज्य प्रसिद्धी प्रमुख दत्तात्रय मुजमुले कला क्रीडा विश्व समितीचे तालुकाध्यक्ष अनिल वैरागे पुरोगामी पत्रकार संघाचे तालुकाध्यक्ष रणजीत घाडगे, सचिन लांडगे मुनीर कुरेशी शेख इक्बाल किशोर भांडे सिंधुताई मुळे अनिता ताई कसबे यांच्यासह इतर पदाधिकारी व शेकडो कलावंत उपस्थित होते.

# ग्रंथपालन प्रमाणपत्र उत्तीर्ण विद्यार्थ्यांना अनेक संधी जिल्हा ग्रंथालय अधिकारी वंदना काटकर यांचे प्रतिपादन




लातूर :- एलटीसी अर्थात ग्रंथपालन प्रमाणपत्र कोर्ससाठी आता किमान बारावी उत्तीर्णची अट झाली असून तो कोर्स आता जानेवारी ते जून असा सहा महिन्यांचा करण्यात आला आहे,त्यात संगणकीय ज्ञानाला विशेष महत्व असून,एलटीसी उत्तीर्ण विद्यार्थ्यांनी केवळ सार्वजनिक ग्रंथालयातला कर्मचारी होण्यापेक्षा पुढे बी.लिब,एम.लिब,पीएचडी,नेट/सेट करुन शाळा,महाविद्यालये, आयटी,वैद्यकीय,एनसीएल,महानगरातील ग्रंथालये अशा व्यापक क्षेत्रात जाण्यासाठी प्रयत्न करावेत असा सल्ला देवून जिल्हा ग्रंथालय अधिकारी वंदना काटकर यांनी विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या.

शुक्रवार,दि.४ ऑक्टोबर २०२४ रोजी हुतात्मा स्मारक येथे जिल्हा सार्वजनिक ग्रंथालय संघ संचलित ग्रंथपालन प्रमाणपत्र वर्ग २०२४ च्या विद्यार्थ्यांचे प्रमाणपत्र वंदना काटकर यांच्या हस्ते करण्यात आले,त्यावेळी मार्गदर्शन करताना त्या बोलत होत्याअध्यक्षपदी जिल्हा ग्रंथालय संघाचे अध्यक्ष ग्रंथमित्र प्रभाकर कापसे हे होते.मंचावर मराठवाडा ग्रंथालय संघाचे अध्यक्ष तथा जिल्हा ग्रंथालय संघाचे कार्यवाह ग्रंथमित्र राम मेकले,जिल्हा उपाध्यक्ष ग्रंथमित्र युवराज जाधव, ग्रंथमित्र हावगी राव बेरकीळे,परिक्षा अधिकारी हरिश्चंद्र डेंगळे,वर्गाचे शिक्षक युवराज अंधोरीकर यांची उपस्थिती होती.

अध्यक्षीय समारोपात प्रभाकर कापसे यांनी नकारात्मकता सोडून काम करा,सर्वच क्षेत्रात पेपरलेस यंत्रणा येत आहे, त्यासाठी संगणकाचे ज्ञान आत्मसात करा,तुमच्या सारखे विद्यार्थी हेच उद्याच्या ग्रंथालय चळवळीचे वाटेकरी व्हाल,लातूर जिल्ह्याच्या ग्रंथालय चळवळ आणि ग्रंथपालन वर्गाने एक राज्यात एक लौकिक मिळवला आहे असे सांगितले.

ग्रंथमित्र युवराज जाधव यांनी या ग्रंथालयाचे अनेक विद्यार्थी ग्रंथालय संचालक,सहाय्यक ग्रंथालय संचालक,लिपिक, निर्गम सहाय्यक,निरीक्षक आदी पदावर पोहोचले आहेत, अनेक जिल्ह्यात सर्वाधिक १७ ग्रंथमित्र आहेत,अनेक ग्रंथालयांनाही शासन पुरस्कार जिल्ह्यात ६७१सार्वजनिक ग्रंथालये आहेत हे क्रियाशील ग्रंथालय चळवळीमुळे घडल्याचे नमुद केले.ग्रंथमित्र राम मेकले यांनी ग्रंथपालन वर्गाची ६० क्षमता आहे, ५२ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. वर्गातून मुकुंदराज अबुंलगे,आशा लांडगे व विजया अभंगे हे अनुक्रमे प्रथम,द्वितीय व तृतीय आले.७ विद्यार्थी प्रथम श्रेणीने पास झाल्याचे असून विद्यार्थ्यांनी गुणपत्रक घेवून जाण्याचे आवाहन प्रास्ताविकात केले.

ग्रंथामित्र हावगीराव बेरकीळे,हरिश्चंद्र डेंगळे,युवराज अंधोरीकर,वैशाली दुरुगकर,विद्यार्थी अंशुमणी आडे यांनीही मनोगत व्यक्त केले.प्रारंभी मान्यवरांचा शाल,ग्रंथ व पुष्पहाराने स्वागत करण्यात आले.हरिश्चंद्र डेंगळे यांची पुणेला बदली झाल्याबद्दल त्यांना निरोप देण्यात आला.या कार्यक्रमालाजिल्हा सार्वजनिक ग्रंथालय संघाचे सह कोषाध्यक्ष ग्रंथमित्र काशिनाथ बोडके, ग्रंथमित्र गुप्तलिंग स्वामी,सुशील मेकले आदिंनी सहकार्य केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अनिल पाटील यांनी केले.संचालक बाळकृष्ण होळीकर यांनी आभार मानले.

# भीमशक्ती सामाजिक संघटनेच्या अल्पसंख्याक सेलच्या कार्याध्यक्षपदी शेख अल्लाउद्दीन नूर यांची निवड



केज/प्रतिनिधी दिनांक ३ ऑक्टोंबर २०२४ रोजी केज शासकीय विश्रामगृह केज येथे भीमशक्ती सामाजिक संघटना महाराष्ट्र राज्य यांची बैठक घेण्यात आली याप्रसंगी भीमशक्ती सामाजिक संघटनेच्या अल्पसंख्याक सेलच्या कार्याध्यक्षपदी शेख अलाउद्दीन नूर यांची निवड करण्यात आली. यावेळी जिल्हाध्यक्ष डॉ.अमरेंद्र विद्यागर,मराठवाडा उपाध्यक्ष हरिश्चंद्र विद्यागर,युवा जिल्हा अध्यक्ष अमर माने, महाराष्ट्र सचिव अशोक बनसोडे, मराठवाडा संघटक चंद्रकांत खरात सर, जिल्हा प्रसिद्धीप्रमुख सुनील धीमधीमे , जिल्हा उपाध्यक्ष हेमंत राष्ट्रपाल, शहराध्यक्ष शिवमुर्ती हजारे, नितीन सोनवणे, सिद्धार्थ पोटभरे अशोक सरवदे,दीपक पोटभरे, रणजीत बचुटे,विजयकुमार शिंदे, विकास हावळे, अप्पा मस्के, समाधान धाकतोंडे, विजय दीक्षित इत्यादी मान्यवर उपस्थित होते.

# लातुरात महाराजा अग्रसेन जयंती विविध उपक्रमांनी साजरी

**प्रत्येक व्यक्तीने महाराजा अग्रसेन यांच्या आदर्शांचे पालन करावे : डॉ. अशोक पोद्दार**





लातूर : मानवी जीवनाच्या सर्वांगसुंदर जडणघडणीसाठी प्रत्येक व्यक्तीने महाराजा अग्रसेन यांच्या आदर्शांचे पालन करणे गरजेचे आहे, असे प्रतिपादन येथील ख्यातनाम अस्थिशल्य चिकित्सक तथा पोद्दार हॉस्पिटल चे संस्थापक - संचालक डॉ. अशोक पोद्दार यांनी केले.

अग्रवाल समाज, लातूर, अग्रवाल समाज ट्रस्ट ,लातूर, अग्रवाल महिला मंडल ,लातूर आणि अग्रवाल नवयुवक मंडल, लातूर यांच्यावतीने आयोजित करण्यात आलेल्या महाराजा अग्रसेनजी जयंती उत्सव समारंभात प्रमुख अतिथी म्हणून आपले मनोगत व्यक्त करताना डॉ. अशोक पोद्दार बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अग्रवाल समाज ट्रस्टचे अध्यक्ष नंदकिशोर इंद्राजजी अग्रवाल हे होते. यावेळी मंचावर ट्रस्टचे सचिव अशोक ( गट्टू ) अग्रवाल,सहसचिव कमलकिशोर अग्रवाल, विशाल अग्रवाल, अग्रवाल महिला मंडल अध्यक्षा सौ. नीता अग्रवाल, सचिव सौ. हेमलता अग्रवाल, अग्रवाल नवयुवक अध्यक्ष ॲड. महेश अग्रवाल, सचिव श्यामसुंदर अग्रवाल, आनंद अग्रवाल, ओम पोद्दार आदी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती.

प्रतिवर्षाप्रमाणे यावर्षीही समस्त अग्रकुटुंबांच्या वतीने महाराजा अग्रसेन जयंती विविध धार्मिक, सामाजिक व सांस्कृतिक उपक्रमांनी हर्षोल्हासात साजरी करण्यात आली. यामध्ये नि:शुल्क आरोग्य तपासणी, दिवाली सजावट स्पर्धा, सुदृढ बेबी स्पर्धा, स्वागत दुपट्टे तयार करणे, फॅन्सी ड्रेस स्पर्धा, लहान मुलांसाठी लिटल शेफ स्पर्धा, वरिष्ठांची क्रीडा स्पर्धा, कुंडी सजावट स्पर्धा, चुनरी तयार करणे स्पर्धा, एक ते तीन वर्षाच्या बालकांसाठी तीन चाकांच्या सायकलची स्पर्धा, स्लो सायकल स्पर्धा, स्लो स्कुटर स्पर्धा, डान्स स्पर्धा, एक मिनिट गेम स्पर्धा, अंताक्षरी, अग्रवाल क्रिकेट लीग स्पर्धा, ध्वजारोहण, रक्तदान शिबीर, शोभायात्रा असे विविध उपक्रम राबविण्यात आले. जयंती उत्सवाच्या समारोहाच्या दिवशी, गुरुवारी सायंकाळी शहराच्या प्रमुख मार्गावरून काढण्यात आलेल्या भव्य शोभायात्रेने समस्त लातूरकरांची मने जिंकून घेतली. जयंती उत्सवाच्या निमित्ताने आयोजित करण्यात आलेल्या विविध उपक्रम, स्पर्धेतील विजेत्यांना मान्यवरांच्या हस्ते प्रशस्तीपत्रे , पारितोषिके वितरित करण्यात आली.

या सोहळ्यात बोलताना डॉ.अशोक पोद्दार यांनी यावर्षीचा हा जयंती उत्सव अत्यंत धुमधडाक्यात साजरा करण्यात आल्याबद्दल संयोजकांचे कौतुक केले. सर्वांच्या सामूहिक प्रयत्नांमुळेच हे कार्य उत्तमरीत्या पार पडू शकल्याचे सांगून आज समाजाला खऱ्या अर्थाने महाराजा अग्रसेन यांच्या आदर्शांचे पालन करून चालण्याची आवश्यकता असल्याचे सांगितले. लातूरमध्ये अग्रवाल समाज मोठ्या संख्येने असून या समाजाकडे दानतही चांगली आहे. कोणत्याही समाजाच्या धार्मिक - सामाजिक उपक्रमात हा समाज सढळ हाताने सहकार्य करत आला आहे. लातूरच्या जवळपास सर्वच उद्योग क्षेत्रात अग्रवाल समाजाचे प्रस्थ आहे, विकासात समाजाचे उल्लेखनीय योगदान राहिलेले आहे, असे सांगितले. कमलकिशोर अग्रवाल यांनी यावेळी आपले मनोगत व्यक्त करताना महाराजा अग्रसेन यांच्या कार्याची माहिती दिली. जयंती उत्सवाच्या अनुषंगाने राबविल्या गेलेल्या विविध उपक्रमांची माहिती देऊन त्यांनी या कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी डॉ. अशोक पोद्दार यांचा परिचयही करून दिला.

आपल्या अध्यक्षीय भाषणात नंदकिशोर अग्रवाल यांनी यावर्षीचा जयंती उत्सव कार्यक्रम अग्रवाल महिला मंडल आणि नवयुवक मंडळाने घेतलेल्या पुढाकारामुळे कमालीचा यशस्वी झाल्याचे सांगितले. अग्रसेन जयंती उत्सव सोहळ्यासाठी सध्याची अग्रसेन भवनची जागा कमी पडत असून लवकरच नवीन अग्रसेन भवनच्या उभारणीचे काम हाती घेतले जाईल. त्यासाठी दोन - तीन एकर जागेचा शोध सुरु आहे, जागा मिळताच या कार्याला सुरुवात करण्यात येईल असेही त्यांनी स्पष्ट केले. यावेळी अशोक अग्रवाल, नीता अग्रवाल, ॲड. महेश अग्रवाल यांनीही आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन राहुल अग्रवाल, श्रद्धा अग्रवाल, अनुराधा अग्रवाल यांनी तर आभार प्रदर्शन राहुल अग्रवाल यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी अग्रवाल समाज ट्रस्ट, लातूर, अग्रवाल समाज, लातूर, अग्रवाल महिला मंडल , लातूर, अग्रवाल नवयुवक मंडल , लातूरच्या सर्व पदाधिकाऱ्यांनी परिश्रम घेतले.

# आज संध्याकाळी शहरातील महात्मा फुले नगर येथे समस्त केज वासियांच्या वतीने शोक सभेचे आयोजन

**शोकसभेस मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले.**

केज/प्रतिनिधी आज संध्याकाळी शहरातील महात्मा फुले नगर येथे समस्त केज वासियांच्या वतीने शोक सभेचे आयोजन करण्यात आले आहे. तरी केज तालुक्यासह शहरातील व कालकथित सुमेध बप्पा शिंदे यांच्यावर प्रेम करणाऱ्या सर्व मित्र परिवारांनी शोकसभेस मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे. याबाबतचे सविस्तर वृत्त असे की, युवा नेते सुमेध बप्पा शिंदे यांचे दिनांक ०१




ऑक्टोबर २०२४ रोजी हृदय विकाराच्या धक्क्याने दुःखद निधन झाले आहे. त्या अनुषंगाने दिनांक ०५ ऑक्टोबर २०२४ रोजी सायंकाळी ०७:०० वाजता एल एफ सी चौक महात्मा फुले नगर येथे शोकसभेचे आयोजन समस्त केज वासियांच्या वतीने करण्यात आले आहे. तरी केज शहरासह तालुक्यातील व परिसरातील नागरिकांनी उपस्थित राहावे असे अवाहन समस्त केज वासियांच्या वतीने करण्यात आले आहे.

## बालरंगभूमी परिषदेच्यावतीने लातुरात दिव्यांग बालकांचा सांस्कृतिक महोत्सव

लातूर – संपूर्ण महाराष्ट्रात बालरंगभूमी परिषदेच्यावतीने जिल्हानिहाय दिव्यांग बालकांसाठी सांस्कृतिक व कला महोत्सवाचे नियोजन करण्यात आले आहे. या अनुषंगाने लातूर जिल्ह्यातील दिव्यांग बालकांचा यहाँ के हम सिकंदर हा सांस्कृतिक महोत्सव दयानंद महाविद्यालयाच्या सभागृहात दि. २३ आक्टो. २०२४, वार बुधवार रोजी आयोजित करण्यात आला आहे.

या महोत्सवात लातूर जिल्ह्यातील तब्बल ३० संघातून किमान ३०० ते ३५० दिव्यांग बालक सहभागी होऊन विविध कलांचे सादरीकरण करणार आहेत. परिषदेच्यावतीने सर्व बालकांसाठी भोजनाचे आयोजन केले असून सर्व संघाना मानदेय देण्यात येणार आहे. शिवाय दिव्यांग बालकांनी बनवलेल्या विविध वस्तूंचे प्रदर्शन व विक्री स्टॉल लावण्यात येणार आहेत. या प्रसंगाचे औचित्य साधून या समारंभात दिव्यांगांसाठी काम करणाऱ्या संस्था व शिक्षकांचा यथोचित सत्कार व सन्मान करण्यात येणार आहे.

२३आक्टों ला सकाळी ९ वाजता उद्घाटन होणार असून उद्घाटन समारंभास परिषदेच्या महाराष्ट्र अध्यक्षा निलम शिर्के – सामंत व महाराष्ट्राचे उपाध्यक्ष ड. शैलेश गोजमगुंडे हे उपस्थित राहणार आहेत. बालरंगभूमी परिषदेच्या या उपक्रमाच्या समिती प्रमुख म्हणून उपाध्यक्षा सुवर्णा बुरांडे या कार्यरत असून समिती सदस्य म्हणून रवी अघाव, रणजित आचार्य, ड. बालाजी म्हेत्रे, प्रिती ठाकूर, महेश पवार, रवी सावंत, ऋतुराज सुरवसे आदी काम पाहत आहेत. या भावस्पर्शी महोत्सवाला लातूरकरांनी उपस्थित राहावे व दिव्यांग बालकलाकारांना प्रोत्साहित करावे असे आवाहन बालरंगभूमी परिषदेच्या अध्यक्षा सुमती बिडवे, कार्याध्यक्ष मयूर राजापूरे, उपाध्यक्षा हिरा वेदपाठक, प्र. कार्यवाह प्रा. नवलाजी जाधव यांनी केले आहे.

## झुंडशाही करून ओबीसी नेत्यांना अपमानित करणाऱ्या समाजकंटकाचा हिमायतनगर ओबीसी समाज बांधवांकडून निषेध..

हिमायतनगर / प्रतिनिधी:– –महाराष्ट्रातील पुणे येथे एका कार्यक्रमासाठी गेलेले मागासवर्गीय आयोगाचे माजी अध्यक्ष तथा ओबीसी नेते प्रा.लक्ष्मण हाके यांच्यावर काही समाजकंठकांनी त्यांना जीवे मारण्याचा प्रयत्न करून त्यांची बदनामी करण्याचा व्हिडिओ सोशल मीडियावर प्रसारित केला त्या भ्याड हाल्याच्या निषेधार्थ हिमायतनगर येथे दिनांक ३ ऑगस्ट रोज गुरूवारी निषेध रॅली काढण्यात आली यावेळी उपस्थित समाज बांधवांनी समाजामध्ये झुंडशाही करणाऱ्या काही समाजकंटकाचा दहन म्हणून काही प्रत्येकात्मक पोस्टर जाळून तालुक्यातील ओ.बी.सी. समाज बांधवांनी दुपारी १२ वाजता श्री परमेश्वर मंदीरासमोर डोक्याला काळ्या पट्ट्या बांधून त्या हल्लेखोरांना तात्काळ अटक करण्याची मागणी करत ह्या झुंडशाही करणाऱ्या समाजकंठकांचा जाहीर निषेध केला. या बाबत सविस्तर वृत्त असे की महाराष्ट्र मागासवर्गीय आयोगाचे माजी अध्यक्ष तथा ओबीसी नेते प्रा. लक्ष्मण हाके यांच्यावर दि.३० सप्टेंबर रोजी पुणे येथे एका सार्वजनिक कार्यक्रमास जात असताना त्यांना रस्त्यात गाठून काही मराठा जातीच्या समाजकंठकांनी त्यांना जीवे मारण्याचा प्रयत्न करून त्यांच्यावर जीवघेणा हल्ला केला व त्या घटनेचा व्हिडिओ सोशल मिडीयावर




प्रसारित करून त्याना बदनाम करण्याचे कटकारस्थान काही लोकांनी व समाजकंठकानी केल्यामुळे हिमायतनगर तालुक्यातील सकल ओबीसी समाजाच्या भावना दुखावल्या गेल्या आहेत त्यामुळे सकल ओबीसी समाजाच्या वतीने या घटनेच्या निषेधार्थ दि. ३ ऑगस्ट २०२४ रोजी शहरातील श्री परमेश्वर मंदिरासमोर झुंडशाहीच्या प्रतीकात्मक पोस्टरचे दहन करण्यात येऊन ह्या घटनेच्या निषेधार्थ रॅली काढण्यात आली या प्रसंगी दादागिरी नही चलेगी... नही चलेगी ... नही चलेगी.... झुंडशाही नही चलेगी... नही चलेगी ... नही चलेगी.... अश्या घोषणाबाजी करण्यात आली व तसेच ओबीसी नेते प्रा. लक्ष्मण हाके यांना तात्काळ न + सुरक्षा देऊन हल्लेखोरांना त्वरीत अटक करा अशी मागणी ओबीसी समाज संघटणा तालुका अध्यक्ष बाबाराव जरगेवाड, दिलीप राठोड, सुनील चव्हाण, प्रकाश हाके, रवी जोनापले, बाळु मुडगूलवाड, गजु बाचकलवाड, आनंदा मूतणेपवाड, सदाशिव सातव, पि.के. चव्हाण, दत्तराव हाके, साईनाथ आनमवाड, नितेश हाके, पांडुरंग आडे, बापूराव डूडुळे, माधव मेचेवाड, संतोष चव्हाण, रवी राठोड. लक्ष्मन ढानके, मारोती अकलवाड, शिवराम लिंगमपल्ले गणेश घोसलवाड, देसाई राऊलवाड. आदींसह ओबीसी समाज बांधवानी केली येथील पोलीस प्रशासनास केली आहे यावेळी पोलिसांनी आंदोलनकर्त्यांची अटक करून सुटका केली.

## महायुतीच्या काळात विधिमंडळ समित्याच गायब

मुंबई : २६ नोव्हेंबर रोजी राज्य सरकारचा कार्यकाळ संपणार आहे. यामुळे राज्यात काही दिवसातच विधानसभा निवडणुकीची रणधुमाळी सुरू होणार आहे. २०१९ ते २०२४ या पाच वर्षाच्या कालावधीत झालेल्या १२ अधिवेशनांमधील प्रश्नांचा अभ्यास आणि विधिमंडळ कामकाजाचा लेखाजोखा मुंबईतील संपर्क संस्थेने मांडला आहे. याबाबतचा अहवाल या संस्थेने प्रसिद्ध केला आहे. या अहवालात अनेक धक्कादायक माहिती उघड झाली आहे. या पाच वर्षाच्या कार्यकाळात विधिमंडळात विचारण्यात आलेल्या प्रश्नात महिलांविषय प्रश्नांची दुपटीने वाढ झाली, तर बालकांवरील प्रश्नांत निम्म्याहून अधिक घट झाली आहे. पण, अल्पसंख्या सामजाविषयी फक्त नऊ प्रश्न विचारण्यात आल्याचे समोर आले आहे. या कार्यकाळात आमदारांनी विधिमंडळात ५,९२१ प्रश्न मांडले आहेत. तसेच १४ व्या विधानसभेत संपूर्ण पाच वर्षाच्या काळात विधिमंडळ समित्यांचे कामच झाले नसल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. महाविकास आघाडी सरकार सत्तेत आली होती, त्यावेळी विधिमंडळ समित्यांची नियुक्ती करण्यात आली होती. पण कोरोनामुळे या समित्यांना काम करता आले नाही. पुढे महाविकास आघाडी सरकार कोसळले. यानंतर महायुती सरकार सत्तेत आले, यावेळी या सरकारने विधिमंडळ समित्या रद्द केल्या. पण, आतापर्यंत विधिमंडळ समित्या महायुती सरकारने नियुक्त केल्या नसल्याची माहिती या अहवालातून उघड झाली आहे.

# नकाशावर नाही... पण मायबापहो आम्ही बी भारताचे लोकचं हावं.

**अडीचशे वस्तीचे गाव सोयीसुविधांपासून वंचित जंगलावरच चालते उपजीविका या भागातील बहुतांश कुटूंबांची ९ उपजीविका जंगलावरच अवलंबून आहे. जंगलातील रानमेवा गोळा करून आजबाजूच्या गावात विक्री करण्याची अनेक पिढ्यांची परंपरा आहे. त्यामुळे गावात शिक्षणाचाही मागमूस नसल्याचे दिसून येते. उपचाराअभावी अनेकांचा मृत्यू गावात रुग्णालय नाही. त्यात सात किलोमीटरपर्यंतचा कच्चा रस्ता, त्यामुळे वाहनही येत नाही. परिणामी अत्यवस्थ रुग्ण, गर्भवती महिला यांना रुग्णालयात दाखल करताना मोठी कसरत करावी लागते.**

किनवट/शेख शौकत :– स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवी वर्षानंतरही रस्त्याअभावी रुग्णांना झोळीत टाकून किंवा खांद्यावर उचलून न्यावे लागत असलेल्या किनवट तालुक्यातील वाघदरी या गावाचे नामो निशान राज्याच्या नकाशावर नाही. त्यामुळे मायबाप आम्ही या भारताचे लोक नाही का? अशी विचारणा येथील गावकऱ्यांनी केली. मात्र या गावात आता स्वतंत्र मतदान केंद्र दिले जाणार आहे. याबाबतचा प्रस्ताव सहायक जिल्हाधिकारी तथा प्रकल्प अधिकारी कावली मेघना यांनी शासनाकडे पाठविला आहे. कावली मेघना व त्यांच्या टीमने अतिदुर्गम डोंगरावर वसलेल्या मांजरीमाथा व वाघदरी या गावांना पायी चालत व दुचाकीवर जाऊन भेट दिली. भाषेनुसार प्रांत रचना झाली अन वाघदरी हे आदिवासी बहुल भागातील अडीचशे लोक वस्तीचं गांव किनवट तालुक्यात आलं. परंतु स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षाची सांगता झालेली असतानाही



वाघदरी महाराष्ट्राच्या नकाशावर कोरले गेले नाही. हे गांव नकाशावरच नसल्याने गावाचे अस्तित्व अधांतरी होते. किनवट हा आदिवासी बहुल भाग असून महाराष्ट्र आणि तेलंगणाच्या सीमेवर असल्यामुळे सीमावर्ती भागातील बहुतांश गावात हवा तसा विकास झालेला नाही. त्यात काही गावात रस्ते पोहचलेले नाहीत. अडीचशे वस्तीचे वाघदरी गावाचे अस्तित्व नकाशावरच नसल्याने कोणत्याच सोयी सुविधा या गावापर्यंत पोहचलेल्या नाही. सात किलोमीटर जंगलात जीव मुठीत घेऊन येथील ग्रामस्थांना पायपीट करावी लागते. जंगलातून वाट शोधावी लागते. जलधरा गावापर्यंत चांगला रस्ता आहे; पण तिथून सहा किलोमीटर संपूर्ण रस्ता जंगलातून जातो. जलधरा गावापासून मांजरीमाथा हे गाव साडेतीन किलोमीटर तर वाघदरी तिथून पुढे साडेतीन किलोमीटर अंतरावर आहे. या दोन्ही गावापर्यंत रस्ताच नाही. माळावरील चढ–उतार, दगड गोटे, पाण्याचे ओढे असा खडतर प्रवास दोन्ही गावांतील ग्रामस्थांना करावा लागतो. गावापर्यंत कोणतेच वाहन जात नसल्याने कुणी आजारी पडला किंवा गरोदर माता असेल तर तिला झोळी करून खांद्यावर उचलून न्यावे लागते, अशी परिस्थिती आहे. रस्ता व्हावा म्हणून अनेक वर्षापासूनची मागणी आहे. त्यामुळे आम्ही या भारताचे लोक आहोत की नाही असा सवाल येथील नागरिक मायबाप सरकारला करीत असतात. कावली मेघना यांनी स्वतंत्र मतदान केंद्र देण्याचा प्रयत्न करून त्यात भर घातली आहे. कावली मेघना यांच्या समवेत नायब तहसीलदार महंमद रफिक, रामेश्वर मुंडे, मंडळ अधिकारी दाऊदखान, गाडे, वनपरिक्षेत्र अधिकारी उमेश ढगे, शिवणी राऊंड वनपाल बाबू जाधव,व तलाठी मुखाडे, ग्रामसेवक यांची उपस्थिती होती.

## एन,सी.सी.द्वारा 'स्वच्छता ही सेवा २०२४' अभियानांतर्गत नाना नानी पार्कमध्ये स्वच्छता श्रमदान संपन्न.

लातूर :– भारत सरकारने चालू केलेल्या 'स्वच्छता ही सेवा २०२४ या अभियाना अंतर्गत दि. ०२ ऑक्टोबर २०२४ रोजी ५३ महाराष्ट्र बटालियन एन.सी. सी, लातूर व महात्मा बसवेश्वर महाविद्यालय, एन. सी. सी विभाग, लातूर यांच्या संयुक्त विद्यमाने नाना–नानी पार्कमध्ये स्वच्छता श्रमदान करण्यात आले. या कार्यक्रमांमध्ये प्रथम ५३ महाराष्ट्र बटालियन एन.सी.सी, लातूरचे कमांडिंग अधिकारी लेफ्टनंट कर्नल वाय. बी. सिंग व महात्मा बसेश्वर महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. संजय गवई यांनी उपस्थित असलेल्या सर्व कॅडेट व कर्मचारी यांना मार्गदर्शन केले व स्वच्छतेचे महत्व पटवून दिले. या कार्यक्रमांमध्ये एकूण ३०० हून अधिक एन.सी.सी कॅडेट विविध महाविद्यालयाचे सहभागी झाले होते. महात्मा बसवेश्वर महाविद्यालयातील एन. सी. सी.चे केअर टेकर डॉ. सुजित हांडीबाग यांनी ५३ महाराष्ट्र



बटालियन एन. सी. सी., लातूरचे कमांडिंग अधिकारी यांच्या सूचनेनुसार सर्व कॅडेट कडून स्वच्छतेसाठीची पूर्वतयारी करून घेतली व कार्यक्रम यशस्वीरित्या पार पडला. या स्वच्छता श्रमदान कार्यक्रमांमध्ये ५३ महाराष्ट्र बटालियन एन.सी.सी, लातूर मधील सुभेदार मेजर शंभू सिंग, सुभेदार हुरेंद्रा सिंग, सुभेदार संजय चिखली, सुभेदार शेख पाशा, सुभेदार उत्तम पाटील, नायब सुभेदार बाजीराव पाटील, नायक सुभेदार देवेंद्र सिंग व इतर पीआय स्टाफ, देशी केंद्र माध्यमिक विद्यालयचे ए. एन. ओ. सचिन गिरवलकर, व्यकटेश माध्यमिक विद्यालयचे ए. एन. ओ. राजेश देवकर यांनी सहभाग नोंदवला होता. तसेच लातूर महानगरपालिकेचे स्वच्छता कर्मचारी यांनीही या कार्यक्रमास उपस्थिती दर्शवली होती. स्वच्छता श्रमदान या कार्यक्रमात सहभागी झालेल्या सर्व पदाधिकारी व एन. सी.सी. कॅडेट यांनी सकाळी नऊ ते अकरा असे एकूण दोन तास नाना नानी पार्क मध्ये श्रमदान करून संपूर्ण नाना नानी पार्कची स्वच्छता केली व गोळा केलेला कचरा महानगरपालिकेच्या वाहनांनी उचलण्यात आला. या कार्यक्रमाच्या शेवटी सर्व कॅडेट व पदाधिकाऱ्यांनी एकत्रित स्वच्छतेची शपथ घेतली व राष्ट्रगीताने या कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

## रोटरी क्लबच्या कार्यात सहभागी व्हा-डिस्ट्रिक्ट गव्हर्नर डॉ.सुरेश साबू

**दहा शिक्षक–शिक्षिकांना नेशन बिल्डर अवॉर्ड चे वितरण**

केज/प्रतिनिधी रोटरी इंटरनॅशनल ही जगातील दोनशेहूनअधिक देशात मैत्री,समाजसेवा व इतर अत्यावश्यकउपक्रमा सह काम करणारी सर्वात मोठी व प्रतिष्ठित अशी सामाजिक संस्था असून आपण या संस्थेचे सदस्य होऊन मानवी कल्याणा साठी हातभार लावा असे आवाहन रोटरी डिस्ट्रिक्ट ३१३२ चे प्रांतपाल रो.डॉ. सुरेश साबू यांनी केज रोटरी क्लबच्या 'नेशन बिल्डर अवॉर्ड' च्या वितरण प्रसंगी केले. यावेळी सहप्रांतपाल रो. विवेक गंगणे,नगराध्यक्षा तथा केज रोटरी क्लबच्या माजी अध्यक्षा सीताताई बनसोड,केज नगरपंचायत चे मुख्याधिकारी सचिन देशपांडे,फर्स्ट लेडी निर्मलादेवी रोटरी क्लब ऑफ केज चे विद्यमान अध्यक्षरो. प्रकाश कामाजी व सचिव रो.अनंत तरकसबंद इत्यादींची उपस्थिती होती. केज रोटरी क्लबच्या वतीने केज तालुक्यातील दहा शिक्षक–शिक्षिकानां 'नेशन बिल्डर अवॉर्ड' अर्थात राष्ट्रनिर्माते शिल्पकार पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.त्यावेळी प्रांतपाल डॉ.साबू बोलत होते.यावेळी त्यांनी जगभरात रोटरी द्वारे राबविण्यात येणाऱ्या प्रमुख उपक्रमाचीसविस्तर माहिती दिली.केज रोटरी क्लबच्या



आजपर्यंतच्या कार्याची त्यांनी प्रसंशा केली.केजवासीयांनी जगभरात कार्य करणाऱ्या रोटरी मध्ये स्वयंस्फूर्तपणे सहभागीहोण्याचे आवाहन केले.यावर्षीच्या केज रोटरी क्लब नेशन बिल्डर अवॉर्ड २०२४ चे मानकरी संदेश अंबादास फावडे, अशोक अनंतराव जोगदंड मुल्ला समद बशीर साब, अनंत नानाभाऊ जाधवर, श्रीकृष्ण लक्ष्मणराव सिरसट,प्रशांत लक्ष्मणराव जाधव,गीता जीवराज आंडील,वैशाली शंकरराव धाडवे,वैशाली कारभारी बोराडे,स्वाती वामनराव समुद्रे हे मानकरी ठरले. पुरस्कार प्राप्त शिक्षक शिक्षिकांच्या वतीने गीताताई अंडील व संदेश फावडे यांनी मनोगतव्यक्त केले.यावेळी त्यांनी रोटरी क्लबचे पुरस्कार खूपच प्रेरणादायी असल्याचे नमूद केले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन हनुमंत भोसले यांनी केले तर आभार सचिव अनंत तरकसबंद यांनी मानले. कार्यक्रम यशस्वी करण्या साठी रो.विकास मिरगणे, प्रवीण देशपांडे,सूर्यकांत चवरे,अरुण अंजाण, बापूराव सिंगण,प्रा.डॉ. बी.जे.हिरवे,श्रीराम देशमुख यांनी विशेष परिश्रम घेतले.राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली.

## पनवेल येथील घरेलु कामगारांना संसार उपयोगी वस्तूचे वाटप

नवी मुंबई / के.एच. हनवते:– दिनांक ३/१०/२०२४ रोजी पनवेल महानगरपालिका आणि पनवेल तालुका परिसरातील विविध गावामध्ये राहणाऱ्या घरेलू कामगार महिलांना महाराष्ट्र शासनाकडून मिळणारे किचन कीट– संसार उपयोगी भांडी देण्यात आली. शहराच्या ठिकाणी घरेलू कामगार यांची संख्या आणि गरज वाढत चालली आहे. पनवेल परिसरातील जवळच्या गावांमध्ये राहणाऱ्या महिला यामध्ये प्रामुख्याने सहभागी होत आहेत परंतू त्यांची शासन दरबारी कोणतीही नोंद होत नाही. अश्यावेळी युवा संस्थेचे कर्मचारी खेडोपाडी जाऊन सामुहिक रित्या त्यांची नोंद



करीत आहेत. साक्षी गोमले यांनी गेल्या वर्षीपासून विविध सहकाऱ्यांच्या माध्यमातून सुमारे दोनशेहून अधिक घरेलु कामगारांची नोंदणी केली त्या पैकी १७० नोंदीत घरेलु कामगारांना संसार उपयोगी वस्तूंचे वाटप सहाय्यक कामगार आयुक्त शीतल कुलकर्णी आणि युवा संस्थेचे समन्वयक ड. सुजित निकाळजे यांच्या हस्ते खांदा कॉलनी नवीन पनवेल येथे वितरित करण्यात आले. त्यावेळी विद्या रामुगडे,मंगेश कांबळे,रेश्मा साखरे,अजय बोरकर,अजय गायकवाड, जयसिंग रणदिवे यांनी खूप परिश्रम घेऊन भांडी वाटपाचा कार्यक्रम यशस्वीपणे पार पाडला.

PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE